लाड/पागे समितीच्या शिफारशीनुसार
वारसाहक्काच्या अंमलबजावणीबाबत

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन परिपत्रक, क्रमांक -सफाई- २०११/प्र.क्र.३२७/विघयो-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- २१ ऑक्टोंबर, २०११.

**वाचा :-** १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक :- एमएससी- १०७५ /१७९२/ का-५, दिनांक १२ ऑगस्ट, १९७५

२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक :- युटीए-१०७९/ का-१९, दिनांक २१ जून,१९७९.

३) शासन परिपत्रक , नगर विकास विभाग क्रमांक :- बीसीसी-१०८६/ ५४४/ सिआर-६३/८६/ नवि-१०, दिनांक ६ मे, १९८६.

४) शासन परिपत्रक , नगर विकास विभाग क्रमांक :- संकीर्ण-२२९२/१९९९/ प्र.क्र. १६४/९२/नवि-६, दिनांक ५ नोव्हेंबर, १९९२.

५) शासन परिपत्रक , नगर विकास विभाग क्रमांक :- संकीर्ण-२२९२/१९९९/ प्र.क्र. १६४/९२/नवि-६, दिनांक १२ जानेवारी, १९९४.

६) शासन परिपत्रक , नगर विकास विभाग क्रमांक :- संकीर्ण-२२९२/१९९९/ प्र.क्र. १६४/९२/नवि-६, दिनांक ३० जून, १९९४.

७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :- बीसीसी-२००२/१९५२/ प्र.क्र.६५/२००२/१६ ब, दिनांक १ ऑक्टोबर, २००३.

८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :- बीसीसी-२००२/१९५२/ प्र.क्र.६५/२००२/१६ ब, दिनांक २१ एप्रिल, २००६.

९) शासन परिपत्रक , नगर विकास विभाग क्रमांक :- लासशि-२००६/५९/ प्र.क्र. ७७/०६/नवि-६, दिनांक ११ ऑगस्ट, २००६.

१०) शासन परिपत्रक , नगर विकास विभाग क्रमांक :- लासशि-२००६/६९/ प्र.क्र.१०६/०६/नवि-६, दिनांक १८ जानेवारी, २००७.

लाड व पागे समितीने सफाई कामगारांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी केलेल्या शिफारशींबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, सामान्य प्रशासन विभाग व सामाजिक न्याय विभागाकडून वेळोवेळी शासन परिपत्रक / निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. तर वारसा हक्काबाबत नगर विकास विभागाने वेळोवेळी शासन परिपत्रक / शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णय / परिपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आदेशांचे / सूचनांची अंमलबजावणी शासनाच्या विविध विभागाकडून केली जात नाही, असे मोठ्या प्रमाणात [illegible]

आस्थापना शाखा

संघटनांकडून प्राप्त झालेल्या निवेदनावरुन शासनाच्या निदशर्नास आले आहे. संदर्भाधीन क्रमांक ७ व १० वरील सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकान्वये लाड व पागे समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत सूचना दिल्या असुन त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी असे आदेश/ सूचना देण्यात आल्या आहेत असे असतांनाही अंमलबजावणी होत नाही. सदर बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. यास्तव सर्वतोपरी विचार करुन खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

(१) नगर विकास विभागाने वारसा हक्काबाबत निर्गमित केलेल्या शासन निर्णय/ परिपत्रकातील प्रमुख तरतूदी खालीलप्रमाणे आहेत:-

(अ) 'नगरपालिका / महानगरपालिकामधील सफाई कामगारांना त्यांच्या निवृत्तीनंतर, मृत्यूनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.'

सदर वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात आल्या आहेत :-

१. पती / पत्नी
२. मुलगा / सून
३. अविवाहित मुलगी
४. विधवा / घटस्फोटित मुलगी
५. विधवा / घटस्फोटित बहीण
६. वरीलपैंकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास त्यांचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी जवळची नातेवाईक किंवा नामनिर्देशित व्यक्ती.

(ब) सफाई कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय /निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येणार नाही.

(क) वारसा हक्कास पात्र असणाऱ्या व्यक्तींपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/वैद्यकीयदृष्टया अपात्र सेवकाच्या शिफारशीनुसार नोकरी हक्क द्यावा,मात्र मृत सेवकाच्या बाबतीत (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे.

(ड) वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे.

(इ) सफाई कामगार नोकरी करीत असताना त्याला चतुर्थ श्रेणीतच पदोन्नती मिळाल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येणार नाही.

(ई) वारसा हक्काची प्रकरणे ३० दिवसाच्या आत निकाली काढण्यात यावीत.

(उ) सफाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या मुदतीत सफाई कर्मचाऱ्याच्या पात्र कुंटूबियांकडून नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्यांकडे वारसाहक्काने नियुक्ती करण्याकरीता अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

(ऊ) आकृतीबंधामुळे तसेच, स्थायी/ अस्थायी पदामुळे कोणत्याही सफाई कमगारांच्या वारसाहक्काच्या नियुक्तीबाबत अडचण निर्माण होणार नाही. तसेच, सफाई कामगारांच्या बाबतीत निवृत्त/मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी वारसाहक्काने कर्मचारी लागत असल्यामुळे एकूण कर्मचारी वाढत नाही. त्यामुळे आकृतीबंधाची अट वारसाहक्कापुरती लागणार नाही.

वरीलप्रमाणे नगर विकास विभाग व सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या आदेशात नमूद केलेल्या तरतूदींच्या आधारे सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबतची प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही शासनाच्या सर्व विभागांकडून व त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांकडून करण्यात यावी.

निवृत्त/ स्वेच्छानिवृत्त/ मयत/ वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या संबंधित कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन आदेशात वारसा हक्काबाबतच्या तरतूदी नमूद कराव्यात.

सफाई कामगार या पदावर वारसा हक्काने नियुक्ती ही वारसदाराने केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने थेट नियुक्ती देता येते. तथापि, सफाई कर्मचाऱ्यांची पदे उपलब्ध नसल्यास वारसदाराची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन अन्य पदावर (वर्ग-३) नियुक्ती द्यावयाची झाल्यास संबंधित कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १/१०/२००३ अन्वये त्यांना बहाल करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत कार्यवाही करावी.

सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबतच्या प्रकरणी शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांच्या आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी हेतुपुरस्सर टाळाटाळ, कुचराई करतील त्यांचेविरुद्ध शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १२/६/१९९५ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रत्नाकर गायकवाड)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय, मुंबई.

मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.

मा. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक ,मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
महालेखापाल- महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा) मुंबई / नागपूर
महालेखापाल- महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञता) मुंबई / नागपूर
अधिदान व लेखाधिकारी , मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी , मुंबई
सर्व महानगरपालिका
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विमुक्त जाती, व भटक्या जमाती , इमाव व विशेष मागास प्रवर्ग संचालक, पुणे
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, गट- अ, जिल्हा परिषदा
व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ,मुंबई. .
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ,मुंबई.
संचालक , माहिती व जनसंपर्क संचनालय, मुंबई.
ग्रंथपाल,वाचनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व राजकीय पक्षांचे कार्यालय
निवड नस्ती का-विघयो-२.

--------

पाठविले

30 NOV 2011

प्रति,

क्र. आस्थापना-१/ कावि - ४७३८/२०११
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी दि. ३०/११/२०११

१) शाखा प्रमुख नगरपालिका प्रशासन
~~मुख्याधिकारी~~
२) नगर परिषद /नगर पंचायत समिती (सर्व)

२). मा. शासन परिपत्रकानुसार पुढील योग्य ती कार्यवाही सफाईगार यांच्या वारसा हक्काबाबत तात्काळ करण्यात यावी.